# प्रकरण पहिले

# बहिणाबाई यांचे व्यक्तित्त्व

# प्रकरण पहिले

# बहिणाबाई यांचे व्यक्तित्त्व

## प्रस्तावना

प्रतिभा ही कवीला मिळालेली निसर्गाची देणगी आहे. ती जन्मत:च त्यांच्याबरोबर यावी लागते. बहिणाबाई या अशिक्षित होत्या. त्यांना जीवनात जे अनेकविध अनुभव आले त्याचेच चित्रण त्यांनी स्वत:च्या कवितेत केले आहे. त्यांनी हे अनुभव आपल्या स्वच्छ, सुंदर आणि संवेदनशील अंत:करणाच्या दृष्टीनं न्याहाळलेले होते.

काव्यनिर्मितीसाठी समृद्ध व्यक्तिमत्व व जीवनदृष्टी हे दोन घटक महत्त्वाचे असतात आणि हे दोन्ही घटक बहिणाबाईंच्या काव्यात आहेत. त्यांच्या कवितेमध्ये भोवतालच्या परिसराचा, वातावरणाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आला आहे. बहिणाबाईंनी "आपल्या कवितेत शब्दाशब्दातून पाझरणारी प्रतिमा, जिव्हाळा, जीवनाचे मार्मिक सूचक भाष्य, स्त्री जीवनाचे दर्शन चित्रित केले आहे. त्याचप्रमाणे भीषण आगतिकता, समयसूचकता, विनोदपरता, शेतकऱ्यांचे दु:ख, व्यथा, जाणिवा, नेणिवा, रचनेबरोबर हातमिळवणी केलेले अध्यात्म, जीवनाचे मधुर कडू भाष्य, त्यांच्या कवितेमध्ये आढळून येते."[१] जीवनापेक्षा वेगळे चित्र साहित्यात येत नाही. जीवनाची ती एक प्रतिकृती असते. अशी प्रतिकृती जीवन व निसर्गातून बहिणाबाईंनी आपल्या कवितेत साकारलेली आहे.

## बहिणाबाई चौधरी – चरित्रविषयक माहिती

जळगांव शहरापासून दोन मैल अंतरावर 'असोदे' नावाच्या लहानशा खेडेगावात बहिणाबाईंचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव उरवाजी महाजन आणि आईचे नाव भीमाबाई. त्याचं घराणं महाजनाचं. त्यांच्या महाजन घराण्याला गावात अत्यंत प्रतिष्ठेचे स्थान होतं. उरवाजी महाजनांची गावामध्ये प्रतिष्ठा होती. गावातील लोकांची त्यांच्यावर अपार श्रद्धा होती. भीमाबाई यांचे वागणेदेखील आपल्या पतीच्या प्रतिष्ठेला अनुसरुनचं होते. त्या खूप प्रेमळ होत्या. अशा आपल्या आईवडिलांबद्दल बहिणाबाईंना अपार प्रेम होते. त्यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना त्या म्हणतात,

> ''रात दीन गजबज
> असं खटल्याचं घरं
> सदा आबादी आबाद
> माझं असोद माहेर
> गावामधी दबदबा
> बाप महाजन माझा
> त्याचा काटेतोल न्याय
> जसा गावामधी राजा''[२]

बहिणाबाईंनी आपल्या वडिलांची प्रतिष्ठा अशा शब्दात वर्णन केली आहे. गावामध्ये आपल्या वडिलांचा एक प्रकारचा दबदबा आहे, आदर आहे असे त्या सांगतात. आई भीमाबाई यांच्या प्रेमळपणाचा, उदारपणाचा उल्लेख त्यांनी अनेक कवितेमध्ये केला

आहे. आईविषयीचे प्रेम व्यक्त करताना त्या म्हणतात, 'माझी आई म्हणजे आंब्याच्या सावलीप्रमाणे स्वत: ऊनात तापून इतरांना तृप्ती देते.' बहिणाबाईंच्या कवितेमध्ये माहेरबद्दलचा मोठेपणा, माहेरच्या माणसांबद्दलचा जिव्हाळा, माहेरच्या वाटेवरील वस्तुबद्दल असलेले प्रेम .एकूणच माहेराविषयी त्यांना असणारी ओढ त्यांच्या कवितेत आढळते. बहिणाबाईंनी आपले तीन भाऊ आणि चार बहिणींचाही उल्लेख कवितेमध्ये केला आहे. असे भरलेले कुटुंब त्यांच्या माहेरी होते. पूर्वीच्या काळी वयाच्या बारा-तेराव्या वर्षातच मुलींचे विवाह केले जायचे. बहिणाबाईंचेही वयाच्या तेराव्या वर्षीचं जळगावच्या नथुजी चौधरी यांच्याबरोबर लग्न झाले.

बहिणाबाई 'असोदं'च्या महाजन घराण्यातून जळगावच्या चौधरी घराण्यात 'सून' म्हणून आल्या. माहेरच्या सुसंस्काराचा वारसा घेऊन बहिणाबाई सासरी आल्या. त्यांची सासर-माहेरची दोन्ही घराणी प्रतिष्ठित होती. एकत्र कुटुंब पद्धतीत गुण्यागोविंदाने नांदत होती. बहिणाबाईंना, त्यांच्या वैवाहिक जीवनात मात्र फारस सुख लाभल नाही. एकत्र कुटुंब असल्यामुळे प्रत्येकांचे विचार वेगवेगळे. त्यामुळे त्यांच्यात मतभेद सुरू झाले. शेवटी त्यांचे कुटुंब विभक्त झाले. जमिनीची व घराची वाटणी झाली. प्रत्येकजण वेगवेगळे राहू लागले. आपल्या वाट्याला जी जमीन, घर आले होते ते घेवून बहिणाबाईंनी आपला संसार सुरू केला. घरकाम करणे आणि शेतात राबणे हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र बनले. अशातच दुष्काळ पडला. लोकांचे हाल होऊ लागले. म्हणून सरकारने दुष्काळी कामे जाहीर केली. दुष्काळात बहिणाबाईंनी खडी फोडण्याचेदेखील काम केले. असा वेगळा संसार करत असताना त्यांना अनेक बरे-वाईट अनुभव आले. पण आलेल्या प्रसंगाला त्यांनी धैर्याने तोंड दिले. कष्टाची कामे करत असताना कामाचा ताण कमी जाणवावा म्हणून त्या काही गीत गुणगुणत असतं आणि तेच त्यांचे काव्य म्हणून पुढे आले. एके ठिकाणी त्या 'मेहरुणच्या' तलावाचा

मोठेपणा स्पष्ट करतात. मेहरुणचा तलाव तसा लहान नाही. त्याने संपूर्ण जळगावची तहान भागवली आहे. जीवनाविषयी, निसर्गातील घटकाविषयी त्यांची समज प्रगल्भ होती. त्यांच्या जीवनात अनेकविध दु:खे होती तरीही त्या आनंदाने संसाराचा गाडा ओढत होत्या. परंतु हे देखील नियतीला मान्य नव्हते. वयाची तीस वर्षे पूर्ण व्हायच्या आधीच त्यांच्या पतीचे निधन झाले. तरीही त्यांनी आपला धीर खचू दिला नाही. संसाराच्या अर्ध्या वाटेवर जीवनाचा जोडीदार साथ सोडून निघून गेला. संसार हा 'गाडीसारखा' असतो. स्त्री आणि पुरुष त्याची दोन चाके असतात. त्यांच्या या संसाराच्या गाडीचे एक चाक निखळून पडले आणि त्या एकाकी पडल्या. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर,

''सांग सांग धर्तीमाता
अशी कशी जादू झाली
झाड गेलं निधीसनी
माघे सावली उरली ''[३]

घरातील कर्ता सवरता पुरुष निघून गेल्याने बहिणाबाई मनातून एखाद्या वृक्षासारख्या उन्मळून पडल्या. पण त्या खचल्या नाहीत. त्यांना माहित होते, रडण्यात काही अर्थ नाही. आपला संसार, मुले यांच्याकडे आपल्यालांच लक्ष द्यावे लागणार आहे. संसारात जर गोडी आणायची असेल तर रडण्यातचं हसू आणायला हवे. नियतीनं घाला घातला होता त्यामुळे आलेले आव्हान स्वीकारून जगणे क्रमप्राप्त होते. पतीच्या निधनानंतर, मुलांचा सांभाळ करताना संसार चालवत असताना त्यांना खुप त्रास सहन करावा लागला. परंतु आलेल्या परिस्थितीला न डगमगता त्यांनी मोठ्या हिंमतीने तोंड दिले.

प्रत्येक कलावंताच्या कलाकृतीवर त्यांच्या चरित्रातील घटनांचा परिणाम असतो. बहिणाबाईंच्या काव्यातही त्यांच्या जीवनात घडलेल्या घटनांचा परिणाम दिसून येतो. त्यांनी जीवनात जे अनुभवले ते त्यांनी निर्भयतेने कवितेत मांडले. आपले म्हणून त्यांनी काही लपवले नाही. त्यामुळेच त्यांच्या कवितेत अनुभूतीचा जिवंत अविष्कार आहे. जीवन जगत असताना जे काही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभव त्यांना आले त्याचेच चित्रण बहिणाबाईंनी आपल्या कवितेमध्ये केले आहे.

**बुद्धिनिष्ठ बहिणाबाई :**

बहिणाबाईंची कविता वास्तव जीवनानुभवामुळे समर्थ झाली आहे. त्याचे एक कारण त्यांच्या प्रतिभेत आहे तसेच त्यांच्या अनुभवातही आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनाची सुरुवात व्हायची तीच अगदी सकाळी जात्यावर दळण दळण्यापासून. त्यावेळी आतासारख्या विजेवर चालणाऱ्या सार्वजनिक, घरगुती स्वरुपाच्या 'गिरण्या' नव्हत्या आणि जरी गिरण्या असत्या तरी ते पैसे संसाराला उपयोगी पडतील असा विचार करून त्यावेळच्या स्त्रिया स्वतःच, जात्यावर दळण दळीतं बसल्या असत्या. त्यामुळे घराघरांतून जात्यांची घरघर ऐकू येत असे. दळण दळत असताना कष्ट कमी जाणवावे, दळण लवकर संपावे या उद्देशाने कदाचित स्त्रिया ओव्या म्हणतं असाव्यात.

बहिणाबाई तरी याला कशा अपवाद असणार. त्यांनाही पहाटे उठून दळण दळावे लागे. त्या दळताना ओव्या म्हणायच्या. संसारातील दु:ख, विविध समस्या, कामाचा प्रचंड ताण कमी व्हावा व आपल्या माणसांचे गुणगाण गाता यावे, त्यांची आठवण काढता यावी म्हणूनच या स्त्रियांची जात्याशी जवळीक झाली असावी. त्या जात्याला सुख दु:ख सांगायच्या. एक प्रकारचा संवादचं त्या जात्याशी करीत बसायच्या.

त्यांनी जातं आणि जीवन यांची तुलना काही ठिकाणी केली आहे. जात्यातून पीठ येण्याची क्रिया कशी असते ? तर जात्याला दोन पाळू असतात. त्या जात्यामध्ये धान्य घातल्यानंतर ते धान्य त्या दोन पाळूच्या मध्ये भरडले जाते आणि त्यामधून पीठ येते. त्याचप्रमाणे जीवनाचे आहे. आयुष्यातील सुख आणि दु:ख या मानवी जीवनाच्या दोन पाळूच आहेत. जात्यातून धान्य भरडते त्याप्रमाणे सुख-दु:खाच्या पाळुतून माणसांचे आयुष्य भरडते. धान्य भरडल्यानंतर पीठ मिळते त्याप्रमाणे आयुष्य भरडून निघाल्यानंतर माणसांला अनुभवाची शिदोरी मिळते. ही शिदोरी जीवन जगताना अत्यंत उपयोगी पडते. बऱ्याचवेळा एखाद्याचा अनुभव दुसऱ्याला उपयोगी पडतो. बहिणाबाईंनी केवळ चार ओळीतून माणसांला आयुष्यातील सुख दु:खाची ओळख करून दिली आहे.

'मन' ही अशीच एक अजब चीज आहे. बहिणाबाईंच्याही आधी अनेकांनी मनावर लिहिले. रामदास, तुकाराम यांनी मनावर केलेले भाष्य यादृष्टीने लक्षात येते. बहिणाबाईंनी मनाचे वर्णन करताना व्यवहारातले मार्मिक शब्द वापरले आहेत. मनाच एक व्यक्तिमत्त्वच त्याच्या जन्मापासून आपल्या डोळ्यासमोर साक्षात उभं केले आहे. हे मन कधी वासरासारखे ओढाळ असते. तर कधी पाण्यावरच्या लाटाप्रमाणे तरल असते. मनाचे जहर विंचू, सापापेक्षा विषारी आहे. मनाचं हे अस अजब रुप पाहून बहिणाबाईला कल्पना सूचली की कोणत्या नक्षत्रावर हे मन जन्माला आल असावं. त्यांनी मनाचा नेमक्या शब्दातून आकार स्पष्ट केला आहे.

'माझी मुक्ताई' ही कविता म्हणजे बहिणाबाईंच्या बुद्धीमत्तेची एक झलक आहे. एका अशिक्षित स्त्रीने रचलेले ताटीचे अभंग हे हृदयाचे ठाव घेणारे आहेत. हे अभंग ऐकून ज्ञानदेव सुद्धा गहिवरले असे बहिणाबाई वर्णन करतात. मुक्ताईच्या अभंगातील सामर्थ्य

बहिणाबाईंनी किती समर्थपणे आपल्या काव्यात उतरवले आहे. शेवटी त्या म्हणतात, 'अशी कर्तृत्त्ववान बहिण ज्याला लाभली तो भाऊ भाग्यवंतच म्हटला पाहिजे.'

बहिणाबाईंना संसारात, शेतात राबत असताना अनेक बरे-वाईट अनुभव आले. त्यामुळे त्यांची विचारशक्ती प्रगल्भ झाली. ''शिक्षणशास्त्रात असे एक मत आहे की, नागरिकशास्त्र हे शिकवायचे नसते तर आचरणात आणायचे असते. त्याप्रमाणे अध्यात्म आणि मानवधर्म यांचेही असेच आहे. खूप ग्रंथ वाचले, गुरु केले, प्रवचने ऐकली म्हणजे अध्यात्म प्राप्त होते असे नाही. त्याची माहिती होते. खरे अध्यात्म तनामनात मुरावे लागते. मानवधर्म व संसाराचे अंतिम तत्त्व बहिणाबाईंच्या वागण्यातचं प्रकट होत होते. ''[४]

त्यांची निरीक्षणशक्ती किती सूक्ष्म होती, जीवनविषयक दृष्टीकोनही किती विशाल होता हे आपल्या प्रत्ययाला तर येतंच पण त्याचबरोबर त्यांना कर्तव्याची जाणीव असल्याचे दिसून येते. अगदी रोजच्या जीवनातील साध्या साध्या गोष्टींच्या घटनांच्या आधारे फार मोठे तत्त्वज्ञान सांगण्याची त्यांची हातोटी उल्लेखनीय आहे. त्यांचा प्रत्येक अनुभव प्रत्येक प्रसंग, बोलका आहे. भाकरी करत असताना स्त्रीला जो त्रास होतो त्याचे वर्णन त्यांनी किती बोलके केले आहे. चूल लवकर पेटत नाही, धूर होतो, वेळेवर फुकणी सापडत नाही. बऱ्याच वेळानं चूल पेटते आणि त्यावर तवा टाकला जातो. एवढं सगळ झाल्यानंतर पटकन भाकरी मिळतेच असे नाही. तर त्यासाठी आधी हाताला चटके बसतात आणि त्यानंतरच भाकरी मिळते. त्या माणसांना उपदेश करताना म्हणतात माणसा, सदैव सुखाचीच अपेक्षा करीत राहीलास तर तुला ते कदापि शक्य होणार नाही.

त्यांनी 'देव अजब गारोडी' या कवितेमध्ये निसर्गातील एक चमत्कार आपल्या कल्पनाशक्तीने रेखाटला आहे. बी जमिनीत रूजल्यानंतर त्या कोंबातून सुरूवातीला दोनच

पाने वर येतात. कोंबातून येणारी दोन पानं म्हणजे जनुकाय देवाच्या भजनासाठी जोडलेले हात आहेत असे वर्णन त्यांनी केले आहे . एका शेतकऱ्याच्या घरातल्या या निरक्षर स्त्रीने ही संपन्न निर्मिती केली आहे.

त्यांनी काव्यातून सर्वांना जीवन जगण्याचा मंत्र दिला आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक अडी-अडचणी असतात. पण त्या अडचणींना घाबरून न जाता, त्याला त्रासून न जाता, येणाऱ्या प्रसंगाला हसत-हसत सामोर जायला शिकवणारे तत्वज्ञान सांगितले आहे. त्याचप्रमाणे आपल्या अनुभवातून जीवनविषयक दृष्टीकोनही दिला आहे. जीवनातील कारूण्य, व्यक्तीजीवन, समाजजीवन इ. चे वर्णन त्यांनी अत्यंत आत्मीयतेने केले आहे. एक निरक्षर, शाळेचे कधी तोंडही न पाहिलेली स्त्री जीवनाचा अर्थ सांगणाऱ्या कविता रचते. ह्या मला सुचणाऱ्या कविता म्हणजे सरस्वतीची देणं आहे असे ती सांगते. याठिकाणी त्यांच्या सह्दयतेचा, डोळस दृष्टीचा प्रत्यय येतो. त्यांनी आपल्या मनातील भावभावनांना, अनुभवांना कवितेमधून लोकापर्यंत वेगवेगळया रूपकांच्या माध्यमातून पोहचवले आहे.

## खेळकर विनोदी वृत्ती

स्त्रियांना मुळातच विनोदीबुध्दी असते. बऱ्याच वेळा स्त्रिया आपआपसात बोलत असताना उखाण्यामधून विनोदी बोलतात. पण ‘‘त्यांची ही विनोदबुध्दी लक्षात घेण्याऐवजी तो एक बुध्दी नसलेला प्राणी आहे असेच तिचे शब्दचित्र पुरूषांनी साहित्यात चित्रीत केले आहे. बहिणाबाई एक अडाणी स्त्री, शाळेच्या आवारापासून दूर राहिलेली तरीही तिच्या विनोदाची जात गडकरी, कोल्हटकर थाटाची आहे.’’[५] त्यांच्या काव्यात कृत्रिमता नाही. त्याचप्रमाणे विनोदाचा हव्यासही नाही. मराठी काव्यात विनोद फारसा नाही.

ग्रामीण जीवनातील विनोदाला तर काव्यात स्थान नव्हते. हे स्थान प्रथम बहिणाबाईंनी मराठी काव्यात दिले.

बहिणाबाईंच्या कवितेतील विनोदात नुसता उपरोधच नाही तर त्यात सहानुभूतीचा आणि कारूण्याचा ओलावा ओथंबलेला आहे. त्या दृष्टीने 'खोकली माय' ही कविता पाहण्यासारखी आहे . जळगावात एकदा खोकल्याची मोठी साथ आली होती. सारे लोक खोकल्याने हैराण झाले. प्रत्येकाच्या घरातून खोकल्याचा आवाज येवू लागला. त्या आवाजासाठी त्यांनी वाजती चौघडे असा शब्दप्रयोग केला आहे. सगळे उपाय, औषधे झाली तरीही खोकला काही केल्याने थांबेना गावातील सर्व लोक खोकल्याला कंटाळून गेले. अशावेळी गावात एक म्हातारी आली. आणि काहीतरी धर्म करा असे विनवू लागली. गावातला म्होरक्या आधीच त्रासलेला होता. तो चिडूनच म्हणाला ''तुला देण्यासारखे काहीच नाही. तुला गावातला खोकला देतो.'' म्हातारीने ते दान स्वीकारले. आणि गावातील खोकल्याची साथ नाहीसी झाली. पण ती म्हातारी मात्र पुढे एका गल्लीत चोवीस तास खोकत बसायची. लोक तिला 'खोकली माय' असे म्हणू लागले आणि त्या ठिकाणीच तिचा अंत झाला या कवितेतील विनोदाला कारूण्याची झालर आहे.

समाजातील विषमतेचे चित्रण करताना 'नही दियामधी तेल' या कवितेत गरिबाच्या संसारातील ओढग्रस्त अवस्थेचे चित्रण केले आहे. कारुण्याबरोबर विनोदही आलेला आहे. कारण एवढ्या अडचणीवर मात करून शेवटी दिवा लावला पण ती काडीच अंधाराला घाबरली. समाजातील वास्तवतेचं वर्णन त्यांनी विनोदाचा माध्यमातून केले आहे.

बहिणाबाईच्या कवितेत विनोदाचा प्रसन्न शिडकावा आपल्याला आढळून येतो. ''त्यांची विनोदी पृच्छा मार्मिक नाही असे कोण म्हणेल ? विचारांचा आणि वर्णनांचा विनोद

करण्यातही त्यांचा चांगलाच हातखंडा होता. चार ओळीच्या काव्यात चौथ्या ओळीत विनोदाचा स्फोट साधावयाचा हे आधुनिक तंत्र सुध्दा त्यांना पूर्वीच अवगत होते.''[६]

''फाट आता टराटर
नही दया तुफानाले
हाले बाभयीचं पान
बोले केयीच्या पानाले ''[७]

वादळ आल्यानंतर केळीचे पानं फाटते. पण बाभळीच्या पानाला वाकुल्या दाखवत आहे. असेच बहिणाबाईना सूचित करावयाचे आहे. त्याचप्रमाणे नवरा उंच बायको खुजी. अशा जोडीचे वर्णन करताना ताडाचे झाड आणि भुईरिंगणीचे झाड अशा उपमा त्या देतात. ही त्यांच्या कवितेतील विविध उपमातून साधलेली वेगळीच विनोदाची उदाहरणे आहेत.

बहिणाबाईनी आपल्या काही नातेवाईकाची, स्थानिक व्यक्तीची शब्दचित्रे रेखाटलेली आहेत. ते वर्णनात्मक विनोदाचे बहारदार मासलेच आहेत. ''बहिणाईची चुलत सासू 'भिवराई' ही मोठी विनोदी होती. ती अनेकांच्या नकला करून लोकांना हसवी तिचे वर्णन करता करता बहिणाईने विनोदाचा एक मोठा सिध्दांन्तच सांगून ठेवला .

'' नाव ठेवी अवघ्याला
करि सर्वाची नक्कल
हासवता हासवता
शिकवते रे अक्कल''

माणसांना हसवून शहाणे करावयाचे हाच विनोदाचा मुख्य हेतू आहे. त्याचा बोध समाजातील कित्येक गंभीर विद्वानांना झालेला नाही. पण बहिणाबाईने विनोदाचे हे सामर्थ्य ओळखले होते."[८] मुनीर नावाच्या चकण्या कमिटीच्या शिपायाचे वर्णन वाचून तर कुणालाही हसूच येईल. मुनीर शिपाई आल्यानंतर रस्त्यामधली सफाई पाहत असताना डोळे वटारूनच स्वच्छता झाली आहे की नाही हे बघत असे. त्याची दाढी खुरटेल अंशी आहे, 'त्याच्या हातामधी छडी, आणि तोंडामधी विडी, त्याची नजर चकणी, त्याची दोन्ही बुबळं कुणीकडेच असे, असा मुनीर शिपाई आहे.' 'छोटू भैय्या' च्या पोटाचे वर्णनही तसे हास्यकारक आहे.

" पोट माथनीसारखं
वऱ्हे बोंवीचं झांकन
व्होट पोपटाची चोच
पढे तुयशीरामायन "[९]

अशाप्रकारे बहिणाबाईनी अनेक ठिकाणी व्यक्तीचित्रणातून विनोद साकारला आहे. असे त्यांच्या विनोदाचे स्वरुप प्रसन्न करणारे आहे.

बहिणाबाईच्या बऱ्याच कवितामध्ये त्यांची विनोदी वृत्ती पाहावयास मिळते कवितेची जडणघडण ही त्यांच्या जीवनातील विनोदीवृत्तीने झाली आहे असे म्हणावे लागेल. कारण त्यांच्या कवितेमधील जो विनोद आहे तो सहानुभूतीचा आणि कारूण्याचा, ह्दयाला पीळ पाडणारा आहे. त्यांच्या विनोदीवृत्तीमुळे कवितेमधून विविध भाववृत्ती प्रकट होतात. मानवी जीवनपट सुख दु:खाच्या धाग्यांनी विणलेला आहे. प्रत्येक मानवाच्या जन्मात दु:ख हे

असतेच, पण त्यांनी दु:खाला विनोदी कवितेच्या माध्यमातून सुखाची झालर प्राप्त करून दिली आहे.

जगामधे विनोद कसा निर्माण होतो हे कुणालाचं कधी उमगले नाही. मानवाची दु:खे विसरण्यासाठी, येणारा शीण नाहीसा होण्यासाठी, विनोदाची निर्मिती झाली असावी. बहिणाबाईच्या काव्यामध्ये विविध प्रकार आढळून येतात. उदा. समाजजीवनविषयक कविता, निसर्गविषयक कविता, त्याचप्रमाणे व्यक्तीचित्रण करणा-या कविता आहेत. तरीही त्यांच्या कवितेमधे 'विनोदा'ला तेवढेच महत्व आहे. त्यांनी कवितेमधून ज्या विनोदी रचना केल्या आहेत त्या वाचून आपले मन आनंदाने मोहरून जाते.

**धैर्यशील स्त्री**

खानदेशातल्या ज्या भूमीत त्या वाढल्या त्या भूमीनेच त्यांचे व्यक्तिमत्व घडविले. सदा आबादी आबाद असणांऱ्या 'असोदं' सारख्या माहेरहून त्या सासरी आल्या.

अवघ्या तिसाव्या वर्षी बहिणाबाईना वैधव्य आले. पतीच्या निधनाचं दु:ख त्यांना झालं. त्यामुळे त्या मोठ्या आकांताने धरणीमातेला विचारतात, ''झाड निघून गेले, पण त्याची सावली पाठीमागे राहिली.'' त्यानंतर त्या स्वत:ला सावरतात. त्यांच्या सांत्वनासाठी आलेल्या स्त्रियांनाही त्या म्हणतात की, ''माझी किव करू नका. माझा, माझ्या मनगटावर विश्वास आहे. माझ्या हातातील बांगड्या जरी फुटल्या तरी माझ्या हातात कर्तृत्व आहे आणि गळ्यातील मंगळसूत्र जरी तुटले, तरीसुद्धा पतीवरची निष्ठा कमी झालेली नाही.

बहिणाबाई अशिक्षित होत्या. त्या श्रद्धाळू होत्या पण अंधश्रद्धाळू नव्हत्या. त्या कधीच व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, नवससायास यामध्ये अडकल्या नाहीत. त्यांना आपल्या 'स्व' वर आत्मविश्वास होता म्हणून त्या दारी आलेल्या ज्योतिषाला म्हणतात,

''नको नको रे जोतिषा
नको हात माझा पाहू
माझं दैव माले कये,
माझ्या दारी नको येऊ ''[१०]

ज्यावेळी बहिणाबाईंनी कविता रचली त्यावेळचा समाज किती अप्रगत होता. परंतु त्या काळामध्येही त्यांची विचारसरणी किती आधुनिक होती हे आपल्या लक्षात येते. मला देवाने हात दिलेले आहेत. माझं मी कष्ट करून जीवन जगेन. माझे दैव मला माहीत आहे. असे परखडपणे ज्योतिषाला त्यांनी सांगितले. बहिणाबाईंच्या कवितेत आपल्याला आधुनिक विचार करणारी स्त्री आढळते. स्त्री ही विश्वाची जननी आहे. सर्व प्राणीमात्राचे लालनपालन ज्या वात्सल्याने, ममतेने आणि कर्तव्य-कठोरतेने ती करते याला जगामध्ये तोड नाही. संसाराचा गाढा ओढत असताना भलेही तिच्यापुढे समस्यांचे पर्वत येवोत अगर दारिद्रयाचे चटके तिला सहन करायला लागोत ती संकटाना भीत नाही, तर येणाऱ्या संकटाला ती निर्भयपणे सामोरी जाते. बहिणाबाई तर याला कशा अपवाद असणार ! त्या स्वत:च्या भावविश्वाला अत्यंत साध्या, सोप्या शब्दात चित्रित करतात. घरातील सगळी जाबदारी, हिंमत न हारता त्या पार पाडीत होत्या.

''जन्मत:च उत्तुंग प्रतिभेचं वरदान लाभलेल्या बहिणाबाई जीवनाकडे अतिशय समंजसपणे पाहतात. त्यांचे विश्व पांढरपेशाचे नव्हते. तरीही त्यांनी सगळा जीवन संघर्ष मोठ्या हिंमतीने केला. त्यांना जीवनाची अनुभूती फार मोठी वाटत होती. आपण ज्या दृष्टीने

जीवनाचा विचार करतो, जगताना जी भूमिका वठवतो, त्यावरच जीवनाची आपली दृष्टी बनत असते.''[११]

बहिणाबाईंनी काव्याबरोबरच एका हिंमतवान स्त्रीची भूमिका जोपासली आहे. त्यांची विचारसरणी स्वतंत्र आहे. समाज परिवर्तनाची ताकद त्यांच्या विचारात आहे. त्यांना आपल्या सासर-माहेर बद्दल अभिमान आहे. स्वत:च्या कष्टावर सर्व संसार सांभाळणारी, शेतीभाताची हिंमतीने राखण करणारी, एक आत्मविश्वासू, एक हिंमतवान स्त्री आपल्याला या कवितेमधून दिसते. त्यांच्यातील हिंमतवान स्त्री जशी आपल्या नजरेसमोर येते त्याप्रमाणे त्यांच्यामध्ये एक सहनशील स्त्रीही आहे. त्यांच्या 'सासुरवाशीन' या कवितेत त्या सांगतात, 'लेकीनं सासरी राहणं आवश्यक आहे. मुलीला सर्व काही सासरचं असतं. त्यामुळे त्या मुलीला सल्ला देतात, तू सर्व सहन करून घे, वाद घालत बसू नको आणि माहेरची आठवण काढ. किती समजुतदारपणा त्यांच्यामध्ये आहे. त्यांनी या कवितेमधून हिंमतवान स्त्रीबरोबर एका समुजतदार स्त्रीचेही दर्शन घडविले आहे.'

**श्रद्धाशील मन**

बहिणाबाईंनी कधी शाळेचे तोंड पाहिले नाही. त्यांना लिहिता येत नव्हते आणि वाचताही येत नव्हते. विठोबाचे आणि रामाचे मंदिर ह्याच माझ्या शाळा आहेत असे त्या म्हणत. त्यांची परमेश्वरावर गाढ श्रद्धा होती. त्याचप्रमाणे मानवी जीवनावरील श्रद्धा, व्यक्तिविषयक नितांत आदर, कर्मयोगावरील दृढ श्रद्धा अशा विविध स्वरुपातून त्यांच्या श्रद्धाशील मनाचे दर्शन घडते. घरामधील, शेतातील कामे करता करता त्यांनी गाणी रचली. त्यांचे मन श्रद्धाळू होते. त्या स्वत:च्या कवितेचे श्रेय ही आपल्याला घेत नाहीत. त्या म्हणतात, ते 'सरस्वतीचे' देणं आहे. ती विद्येची देवता माझ्या मनामध्ये काहीतरी गुपीतं

पेरते आणि तीच माझ्या शब्दातून प्रकट होऊन बाहेर पडते. सर्व काही 'सरस्वती' देवताचं करते. फक्त ते शब्द माझ्या ओठातून बाहेर येतात. एका अर्थाने हे श्रेय आपण न घेता, कुणा तिसऱ्या व्यक्तीला त्याचं श्रेय देऊन आपण मात्र वेगळं राहण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यामधूनच आपणाला त्यांचा मोठेपणा दिसून येतो.

देवाचे अस्तित्त्व सांगताना त्या म्हणतात, सर्व चराचर सृष्टीमध्ये देव आहे. जो कष्ट करतो, ज्याचे मन स्वच्छ आहे, त्याला देव आपोआप भेटतो. डोळ्यांनी दिसणाऱ्या सूर्यनारायणामध्ये त्या देवाचं रुप पाहतात. पानांच्या हलण्यामधून देवांची चाहूल त्यांना जाणवते. सासरी असणाऱ्या स्त्रीला, आपल्या माहेरात देव भरून राहिला आहे असे वाटते. त्यांच्या मनात देवांविषयी श्रद्धा आहे पण अंधश्रद्धा नाही. त्यामुळे त्यांनी त्या काळामध्ये मांडलेले देवाविषयीचे विचार खूपच परखड असे होते. तुकाराम महाराजांनी ज्याप्रमाणे समाजातील ढोंगीपणावर ताशेरे ओढले आहेत. तसेच बहिणाबाईंनी समाजातील दांभिकतेवर प्रहार केला आहे. त्यांचे मन श्रद्धाळू असल्यामुळे समोरुन पंढरीच्या दिंडीतला एखादा भाविक, वारकरी दिसला की बहिणाबाई त्याला गहिवरुन प्रश्न विचारीत,

''अरे वारकऱ्या तुले
नही उन वारा थंडी
झुगारीत अवघ्याले
आली पंढरीची दिंडी''[१२]

या ठिकाणी त्यांना वारकऱ्यांबद्दल असलेली आपुलकी, कणव दिसून येते. वारकरी पंढरीची वारी पायी जातात त्यावेळी ऊन, वारा, थंडी असते. तेव्हा तुला थंडी वाजत नाही का ? असा प्रश्न त्या करतात. शेतकऱ्याला कर्जबाजारीपणामुळं विठ्ठलाची भक्ती करणेदेखील अवघड होते. तरीसुद्धा शेतकऱ्यांनी जीवनाबद्दल कृतज्ञता बाळगून, पंढरीच्या

विठ्ठलावर भरिभार ठेवावा असे त्या सांगतात. त्यांची परमेश्वराविषयीची कल्पना मात्र वेगळीच आहे. देव हा आपल्यामध्येच असतो पण तो आपल्याला दिसत नाही. आपण कष्ट केले तर देव आपल्याला भेटेल असे त्या सांगतात.

केवळ भक्तीचा आनंद लुटुन बहिणाबाईंचे समाधान होत नाही. मानवजातीच्या कल्याणासाठी त्याचं मन तळमळतं, म्हणूनच त्या लोकांना सांगतात, तुम्ही भजन, प्रवचन ऐकून मन शुद्ध ठेवा. त्यामुळे तुमची वृत्ती राक्षसी होणार नाही. अशा विचारातून आपल्याला बहिणाबाईंच्या श्रद्धाशील मनाचा प्रत्यय येतो. त्यांच्या जीवनात त्यांच्या कृतीत, त्यांच्या विचारांत, आध्यात्मिक अधिष्ठान असल्याचं ठायी ठायी जाणवतं. शेतातली पेरणी, कापणी, रगडणी असो त्यांना त्यामध्येही परमेश्वरांच्या अस्तित्त्वाची जाणीव होते. संतसाहित्याची त्यांना असलेली ओळख, भक्तीपरंपरा यामधून आपल्याला बहिणाबाईंचं श्रद्धाळू व अभ्यासू मन दिसून येते.

## मानवतावादी भूमिका

बहिणाबाईंच्या प्रत्येक कवितेमधून मानव जातीसाठीच काही अमूल्य असे उपदेश, तत्त्वज्ञान आहे. मानवी हिताची कळकळ असणारा तत्त्वज्ञानाचा अमोल ठेवा आहे. त्यांची 'कशाले काय म्हनू नये' ही कवितादेखील मानवाला शहाणे करण्यासाठी लिहिली असावी. त्यामधून त्या मानवाच्या स्वाभाविक गुणांची, वास्तवतेची जाणीव करून देतात. ह्या कवितेत त्या म्हणतात, 'जे कपाशीशिवाय उलतं त्याला बोंड म्हणून नये आणि जे हरिनामाशिवाय बोलतं त्याला तोंड म्हणू नये. ज्या शेतात पाट नाही त्याला मळा म्हणून नये. जो देवाचं दर्शन घेत नाही त्याला डोळा म्हणू नये. जी आपल्या पाडसाला ओळखत नाही तिला गाय म्हणू नये, जिला पान्हा फुटत नाही तिला माय म्हणू नये. स्वत:च्या पोटंच्या

पोरीला विकतो त्याला बाप म्हणू नये, जो आपले इमान, सचोटी विसरतो त्याला नीतीमान म्हणून नये, ज्यामध्ये भाव नाही त्याला भक्ती म्हणू नये. ज्यामध्ये चैतन्य नाही त्याला शक्ती म्हणू नये. त्याचप्रमाणे ज्या माणसात स्वार्थीपणा, ढोंगीपणा आहे त्याला 'माणूस' कसे म्हणावे, असेच त्यांना याठिकाणी सांगावयाचे आहे.

बहिणाबाईंना सर्वात कशाची जास्त चीड येत असेल तर ती माणसांच्या स्वार्थीपणाची. माणूस हा खूप स्वार्थी झाला आहे. त्याला कोणी केलेल्या उपकाराची जाणीव नाही. स्वत:च्या स्वार्थासाठी तो काहीही करायला तयार होतो. मग त्यांच्यापेक्षा कुत्रा, गोठ्यातलं जनावर बरे असे त्या म्हणतात. हे 'माणसा' तू स्वत:चे पोट भरतोस पण पोट भरताना आपल्याला काहीतरी कर्तव्य करायचे आहे हे तू पूर्णपणे विसरतोस. तुझ्यापेक्षा त्या गाई-म्हशी चांगल्या आहेत. कारण त्या चारा खावून दूध तरी देतात. पण तू आपला 'मान, मतलब साधण्यासाठी धावतोस. केवळ लोभासाठी तू माणसांचा काणूस, पशू झाला आहेस. म्हणूनच त्या माणसाला तळमळून विचारतात,

''मानसा मानसा
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस ।''[१३]

बहिणाबाईंनी संपूर्ण मानव जातीलाच व्याकूळ होऊन आव्हान केले आहे. सर्व जगामध्ये स्वार्थाचा वणवा पसरला आहे. प्रत्येकजण स्वत:च्या मतलबासाठी एकमेकांशी भांडत आहेत. जागामध्ये मानवता राहिलेली नाही. ''माणसाने माणूस कसे व्हायचे हीच प्रचंड समस्या मानवजातीपुढे आज उभी आहे. ह्या समस्येचा साक्षात्कार बहिणाबाईसारख्या खानदेशातील एका अडाणी शेतकरी महिलेला व्हावा हा तिच्या

प्रतिभासामर्थ्याचा केवढा पडताळा आहे ! माणसांच्या कल्याणाचा जे नुसता कांगावा करतात ते पंडितकवी नराचा नारायण करण्याच्या वारेमाप वल्गना करीत असतात. पण माणसाच्या जन्माला येऊन तो अजून पुरता माणूसही झाला नाही. हे मानवतेच्या व्याधीचे अचुक निदान ह्या निरक्षर, अपठिक कवयित्रीने केले आहे.''[१४]

मानवाने पुढे पुढे काही शोध लावले. पण हे शोध लावताना मानवी संस्कृतीचा ऱ्हास झाला. मानवाने किल्ल्या कुलपांचा शोध लावला. कोणाचा एकमेकांवर विश्वास राहिला नाही. माणूस स्वार्थासाठी काहीही करू लागला. त्याचे इमान बुडाले, चोरी, लबाडी करू लागला. चोरीवर मात करण्यासाठी माणसाने कुलपाचा शोध लावला. तर कुलुपावर मात करण्यासाठी त्याने कुलुप फोडण्याचा शोध लावला आणि अशा चोरासाठी बेड्यांचा शोध लागला. मानवी संस्कृतीची समाप्ती सुरु झाली ज्यावेळी अंताला प्रारंभ झाला, त्यावेळी याच माणसाने 'वधस्तंभाचा' शोध लावला. मानवाच्या इतिहासाचा बहिणाबाईनी लावलेला हा शोध आणि काढलेला अन्वयार्थ सर्वस्वी नवा आहे. त्यांनी आपल्या काव्यात मानवतावादी भूमिकेचे समर्थन केले आहे. निर्जीव कागद छापल्यानंतर शहाणा होतो, म्हणजे त्यामध्ये काहीतरी घेण्यासारखे विचार असतात. परंतु हा सजीव माणसांसारखा माणूस मात्र वेडाच राहिला. हे बहिणाबाईंचे तत्वज्ञान किती अगाध आहे. तरीही माणसाला वाटते की मीच सर्वापेक्षा शहाणा. परंतु त्याच्या मी पणाला स्मशानातच सिंहासन आहे. असे बहिणाबाई म्हणतात.

## मानवी जीवनाकडे पाहण्याची सहृदय दृष्टी

या विश्वाच्या पसाऱ्यामध्ये 'मानवी जीव' म्हणजे एक क्षुद्र कण. कारण या विश्वामध्ये काय - काय सामावले आहे. सर्वच सजीव सृष्टी ही परावलंबी आहे. एकमेकांवर

अवलंबून आहे. मनुष्याचे जन्माला येणे आणि मरणे हे सुद्धा पराधीन आहे. जन्माला येणे त्यांच्या हातात नाही त्याचप्रमाणे मरणे सुद्धा त्यांच्या हातात नाही. एकसारखं माणसाचे हे जन्म घेणं, मरणं सुरुच आहे. मानवाला श्रम करण्यासाठी दिवस निर्माण केला आणि आलेल्या थकव्यासाठी रात्र निर्माण केली असे हे जीवन आणि मरण आहे. त्यामध्ये फक्त एका श्वासाचं अंतर आहे. तेव्हा या क्षणभराच्या काळामध्ये, काम करता करता देवाजीचे रुप बघा त्याचप्रमाणे जे दारिद्रयाने पिडीत आहेत त्यांना मदत करा. जीवन म्हणजे रडणं नाही तर हसणं आहे. कितीही संकटे आली तरी हसणे म्हणजेच मानवी जीवन. असे हे मानवी जीवन जगताना ते सुद्धा आभाळाच्या तोलाचं आणि मातीच्या मोलाचं असावं.

बहिणाबाई मानवाला तत्त्वज्ञान सांगण्यासाठी काहीवेळा प्रतिकांचा वापर करतात. सुग्रण पक्षीन खोपा विणते. पण तिच्या नराला मात्र खोपा विणता येत नाही. तो फक्त गवताच्या काड्या, तंतू वगैरे आणून देतो आणि सुग्रीन पक्षीन खोपा विणते. बहिणाबाईनी 'संसार' या कवितेत सांगितल्याप्रमाणे प्रत्येक क्षणी दोघांची साथ हवी. त्याचप्रमाणे या ठिकाणी सुग्रन पक्षिनीचा नर खोपा विणत नाही. पण तिला साथ देतो मानवी जीवनही असेच आहे. त्या मानवाला सांगतात, 'अरे माणसा त्या पक्ष्यांकडे जरा बघ. ज्याला फक्त एक चोच आहे. ती चोचच त्याचे सर्व काही आहे. पण माणसा तुला देवाने दोन हात दिले आहेत. त्याचा उपयोग तू दुसऱ्यांच्या कल्याणासाठी कर. या कवितेमधून मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि मानवाच्या कल्याणाचे तत्वज्ञान मांडलेले आहे. जीवनात अनेक मोहाचे क्षण येतात पण आपण त्यात गुरफटून न जाता आपले आयुष्य दुसऱ्यांच्या मदतीसाठी, दुसऱ्यांच्या उपयोगी पडेल असे काहीतरी केले पाहिजे. अशाप्रकारे मानसाचा स्वभाव, त्याने कसे वागावे, जीवनात काय करावे याचा पाठच बहिणाबाईनी निसर्ग व आसपासची अनेक उदाहरणे देऊन मांडला आहे.

## समारोप

बहिणाबाई या अशिक्षित होत्या. तरीही त्यांना जीवन जगताना जे अनुभव आले त्या अनुभवाच्या जोरांवर त्यांनी माणसाला अमूल्य असे विचारधन दिले आहे. त्यांनी संसारात जे जे सोसले ते त्यांनी काव्यरुप केले. ''बहिणाबाई मोठ्या बुद्धीमान, चतुर आणि बहुश्रुत होत्या. त्यांच्या स्वभावाला विनोदाचीही झालर होती. सुरवातीला सुख वाढवणारी आणि दु:खातील कळ कमी करणारी.''[१५] अशी त्यांची कविता विचार समृद्ध करते. साध्या साध्या गोष्टीतून जीवनातले गहन अर्थ सांगणारी त्यांची कविता आहे. त्यांच्या काव्यात अनुभवांचा जिवंतपणा आहे. त्याचप्रमाणे त्यांची निरीक्षण दृष्टही सूक्ष्म आहे. मानवी स्वभाव, त्याचे विविध कंगोरे याठिकाणी बहिणाबाईंनी एकत्र रेखाटले आहेत. जीवनातील तत्वज्ञान सांगण्यासाठी त्या रोजच्या, दैनंदिन जगण्यातल्या प्रतिमा व उदाहरणे देतात. त्यामुळे त्यांची कविता आणखीन जवळची वाटते. अशी ही बहिणाबाईंची कविता आपल्याला खरखुरं जीवन जगायला शिकवणारी आहे.

------

## प्रकरण पहिले

## संदर्भ


१ यादव स.ग., निसर्गकन्या बहिणाबाई, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर आवृत्ती पहिली, १९८२, पृ.क्र.४.

२ चौधरी बहिणाबाई, बहिणाबाईची गाणी, ज्योती पिरिऑकिडल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र.७, ५.

३ तत्रैव, पृ.क्र. २५.

४ चौधरी बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, लेख – निसर्गकन्या माझ्या बहिणाई, इंदिरा संत (लोकसत्ता, डिसेंबर,१९७६). पृ.क्र. ४८

५ यादव स.ग., निसर्गकन्या बहिणाबाई, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, १९८२, पृ.क्र.४५.

६ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना, प्र.के. अत्रे, १९५२, पृष्ठ क्र.१६.

७ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पॅरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र.१०१.

८ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना, प्र.के. अत्रे, पृ.क्र.१६.

९ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र.१२१.

१० तत्रैव, पृ.क्र. २४.

११ प्रमिला भिरुड, बहिणीअीची गाणी-एक अभ्यास, व्यंकटेश प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०००, प्रस्तावना- नागनाथ कोत्तापल्ले, पृष्ठ क्र. २,३.

१२ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र.८४.

१३ तत्रैव, पृ.क्र. ९१.

१४ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना – प्र.के. अत्रे, पृ.क्र. १५.

१५ चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स आवृत्ती चौथी, १९८२, लेख – निसर्गकन्या माझ्या बहिणाई, इंदिरा संत (लोकसत्ता, डिसेंबर, १९७६)


-------